# नियुक्त्या
# मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार

उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, यांच्या आस्थापनेवर खाली नमूद केलेल्या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास पात्रता धारण करणा—या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | एकूण रिक्त पदे | दिव्यांगासाठी आरक्षण पदे (४%) | निवड यादी | नियमाप्रमाणे स्वयंपाकी या पदाची वेतन मॅट्रिक्स |
|---|---|---|---|---|
| स्वयंपाकी | ०२ | निरंक | ०२ | एस — ३<br>₹१६,६०० — ₹५२,४००/—<br>व नियमाप्रमाणे भत्ते |

निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या खंड 'इ' मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे/पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट इत्यादींसह **परिशिष्ट – 'अ'** नमुन्यानुसार, **दिनांक १६/०८/२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्या आधी पोहचेल या बेताने खालील पत्यावर फक्त स्पीड पोस्टाव्दारे (speed post) पाठवावेत :—

**प्रबंधक (कार्मिक), मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, ५ वा मजला, नवीन मंत्रालय इमारत, जी. टी. रूग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई—४०००0१.**

स्पीड पोस्टाव्यतिरीक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमुद केलेल्या दिनांकानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

उपरोक्त अर्जे/कागदपत्रे इत्यादी समाविष्ट असलेल्या ...२/— लिफाफ्यावर **“स्वयंपाकी पदासाठी अर्ज”** असे लिहावे.

स्वयंपाक प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी, तोंडी मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (shortlisting) सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

## अ) पात्रता :—

१. उमेदवार कमीत—कमी चौथी पास असावा.

२. उमेदवाराकडे स्वयंपाकाचे पूरेसे ज्ञान व त्यासंबंधी अनुभव असणे आवश्यक आहे.

३. उमेदवार जाहिरात प्रसिद्धिच्या तारखेला १८ वर्षापेक्षा लहान व ३८ वर्षापेक्षा मोठा नसावा. मागासवर्गीयांसाठी कमाल मर्यादा ४३ वर्षाची असेल.

४. उमेदवार न्यायालयीन/शासकीय कर्मचारी असल्यास विहीत मार्गाने अर्ज करणा—या न्यायालयीन/शासकीय कर्मचा—यांसाठी कमाल वयाची अट नाही.

## ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी:—

१. त्याचे/तिचे चारित्र्य आणि वर्तणुक चांगली असावी.

२. तो/ती करार करणेस सक्षम असावा/असावी.

३. त्याला/तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला/तिला कोणत्याही न्यायालय/ एम.पी.एस.सी. /यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

४. त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

५ त्याला/तिला हयात असलेल्या पत्नी/पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) अर्ज भरण्याचे शुल्कः—

| | |
|---|---|
| १. | अर्ज शुल्क हे **“Assistant Registrar for Registrar General High Court A.S. Bombay”** यांच्या नावे काढलेली **₹. 300/— (रूपये तीनशे मात्र)** ची पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वरुपात असावी/असावा. |
| २. | नोंद :— <br> १. अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. <br> २. भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. |

## ड) निवड प्रक्रियाः—

आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प—सुची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| **अ.क्र.** | **मूल्यांकन पद्धती** | **गुण** |
|---|---|---|
| १ | स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा (उत्तीर्ण गुण किमान १५) | ३० |
| २ | शारीरिक कार्यक्षमता चाचणी | १० |
| ३ | तोंडी मुलाखत | १० |
| ४ | निवड प्रक्रियेचे एकूण गुण | **५०** |

**सुचनाः— १. जर उमेदवार स्वयंपाकाच्या प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तिर्ण झाल्यास त्याचा/तिचा उर्वरित परीक्षेसाठी विचार केला जाणार नाही.**

**२. वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.**

## इ) उमेदवारांनी अर्जासोबत खालील दाखल्यांच्या स्वत:प्रमाणित (Self-attested) केलेल्या छायांकित प्रति सादर कराव्यात.

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला(शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र/ एस. एस. सी. चे बोर्ड प्रमाणपत्र(School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC )

२. शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (४थी, १०वी, १२वी, किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी )

३. स्वयंपाक कामाचा अनुभवाचा दाखला

४. अर्जदाराने त्याला बनवता येणाऱ्या पाककृतींची यादी सोबत जोडावी

५. स्वयंपाकाचा विशेषतेसंबंधीचा दाखला (असल्यास)

६. जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र (त्यांचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर सह) (जाहीरातीसोबत **परिशिष्ट 'ब'** नमुन्यात)

७. सक्षम अधिका—याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी)

...५/—

८. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

९. उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा दाखला

१०. विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला

११. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

१२. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका—यांची(कार्यालयाची) मंजुरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१३. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज जसे की, शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाहप्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

१४. अर्जासोबत **"Assistant Registrar for Registrar General High Court A.S. Bombay"** यांच्या नावे काढलेली **₹. ३००/— (रूपये तीनशे मात्र)** ची पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) जोडावी/जोडावा.

१५. एक पासपोर्ट आकाराचा फोटो सोबत पाठवावा.

१६. अर्जासोबत स्वत:चा पत्ता ठळक अक्षरात लिहिलेले पाच रूपयाचे पोस्टाचे टिकीट लावलेले कोरे पाकिट पाठवावे.

१७. संबंधित इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१८. न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे .

१९. आधार कार्डची प्रत

## फ) उमेदवारांना असेही सूचित करण्यात येते की :—

१. अर्ज विहित नमुन्यातच असावा (जाहीरातीसोबत **परिशिष्ट 'अ'** नमुन्यात).

२. अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

३. उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling)त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

४. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचुक पत्ता पिनकोडसहीत नमूद करावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

५. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल आयडी(e-mail ID), मोबाईल नंबर अर्जात नमूद करावा.

६. उमेदवाराने स्वतःची जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे / जन्मप्रमाणपत्राद्वारे अचुक लिहावी.

७. स्वयंपाकी पदासाठी इ. ४ थी मधील गुण नमुद करणे अनिवार्य असेल. जर उमेदवार इ. ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १० वी किंवा १२ वी असेल व त्याच्याकडे / तिच्याकडे इ. ४ थी चे गुणपत्रक नसेल तर त्याने / तिने अर्ज भरताना इ. ४ थी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकुण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

८. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची/तिची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी

१. ४ थी

२. एस.एस.सी.(S.S.C.)

३. एच.एच.सी.(H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विदयापीठातून प्राप्त केले.

९. काही शाळांच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑफलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळेकडून मिळवावे आणि ते गुण उपरोक्त रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे. सदर गुणपत्रक अर्जासोबत पाठवावे.

१०. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पूर्वी एखादया प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती दयावी तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास तसे अर्जात नमूद करावे.

...७/—

११. उमेदवारांने पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) नंबर आणि त्याचा दिनांक अर्जात नमुद करावा.

१२. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह त्याचा /तिचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल.

१३. उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पूर्ण केले असतील तरच अर्ज स्विकारला जाईल.

१४. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.

१५. नियुक्तीतील उमेदवाराला माननीय मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई, यांच्या बंगल्याशी संलग्न असणा—या नोकर वसाहतीतच राहावे लागेल.

## ग) उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :—

१. **जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार अल्प सुची (shortlisting) करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.**

२. भरतीप्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

३. अपुर्ण/चुकीची माहिती असलेला अर्ज नाकारला जाईल. तसेच कोणतीही वस्तुस्थिती दडपल्यास अर्ज नाकारला जाईल. उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

...८/—

४. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास त्याला / तिला पदावरून काढुन टाकण्यात येईल.

५. अल्पसुचीत समाविष्ट उमेदवार / अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

६. केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हाच केवळ सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

७. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलु शकते असा बदल वेळोवेळी **मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर** प्रसिध्द केला जाईल. त्याकरीता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर लक्ष ठेवावे.

८. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस प्रात्यक्षिक परिक्षेस, शारीरिक चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

९. उमेदवाराने स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच शारीरिक कार्यक्षमता चाचणी परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवारांची तोंडी मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या गुणवत्तेच्या आधारावर ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१०. पात्र उमेदवारांना स्वयंपाक प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी, तोंडी मुलाखतीसाठी नेमलेल्या तारखांना स्वःखर्चाने हजर रहावे लागेल.

११. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा—या उमेदवारांनी स्वतःचे फोटो प्रमाणपत्र( Photo ID) जसे मतदान कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना इत्यादीपैकी एखादा पुरावा आणावा.

१२. उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्याऱ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्याच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला / तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१३. निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे/तिचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१४. निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

१५. उमेदवारांची निवड ही स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारिरीक कार्यक्षमता चाचणी आणि तोंडी मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

१६. या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**आदेशावरुन**

**सही/—**

**दिनांक: ३० जुलै, २०२४** **महाप्रबंधक**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**